अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
**Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
दिनांक :- ०८/०१/२०२५

## प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०२/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री ज्ञानेश येडगे, पोलीस उप निरीक्षक, डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २,७०,०००/- व तडजोडीअंती रू. ७०,०००/- |
| पडताळणी दिनांक | दिनांक १६/१०/२०२४ रोजी |
| लाच स्विकारलेली रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | दिनांक १४/१०/२०४ रोजी यातील तक्रारदार यांचे भावाला एन.डी.पी.एस. च्या गुन्हयात डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई येथे अटक करण्यात आली होती. त्याकरीता तक्रारदार हे डोंगरी पोलीस ठाणे येथे गेले असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे भावाल कमर्शीयल केस मध्ये टाकला तर त्याला जामीन होणार नाही असे सांगून सात-आठ वर्षासाठी जेलमध्ये जाईल असे सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांच्या भावाला कमर्शीयल केस मध्ये न टाकण्याकरीता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे रू. ३,००,०००/- ची मागणी करून तडजोडीअंती रू. २,७०,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिंनाक १६/१०/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द लेखी तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीवरून दिनांक १६/१०/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे भावाल कमर्शीयल केस मध्ये न टाकण्याकरीता तडजोडीअंती रूपये ७०,०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व त्या रक्कमेचा गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन ज्ञानेश येडगे, पोलीस उप निरीक्षक, डोंगरी पोलीस ठाणे, मुंबई यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
**टोल फ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :- acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :- acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :- www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :- www.acbmaharashtra.net